REFBK-0005626
REFBK-0005626

# सांजवात

बाळ रानडे ( नीळकण्ठ )

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

किंमत ८ आणे.

प्रथमावृत्ति वर्षप्रतिपदा शके १८५९

प्रकाशक:—
डॉ. भा. गो. रानडे, M. B., B. S.
सुलतान बझार, हैद्राबाद (दक्षिण)

मुद्रक:—
पांडुरंग महादेव भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणे.




लेखक

REFBK-0005626
REFBK-0005626

# अनुक्रम-


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कविते ! | १ |
| २ | वागीश्वरी वंदन | २ |
| ३ | आशिर्वाद | ३ |
| ४ | माउली | ४ |
| ५ | सागरा ! | ५ |
| ६ | वासंत उषा | ६ |
| ७ | पोरकें पोर | ७ |
| ८ | प्रतीक्षा | ८ |
| ९ | माझे भाग्य | ९ |
| १० | वेडी शंका | १० |
| ११ | भावसंगम | ११ |
| १२ | क्षितिजावर | १२ |
| १३ | निर्झर | १३ |
| १४ | माया ही वेडीच गडे ! | १४ |
| १५ | पाखरा | १५ |
| १६ | कवि आणि शेतकरी | १६ |
| १७ | न्याय ? | १८ |
| १८ | राजसा ! | १९ |
| १९ | संक्रमण | २० |
| २० | वादळ वारा | २१ |
| २१ | कोण ? | २२ |
| २२ | बुवाबाजी | २३ |
| २३ | देवाचिये दारी | २४ |
| २४ | पारिजात | २५ |
| २५ | आजकालची पोरें | २६ |
| २६ | कवींची शाळा | २७ |
| २७ | अवेळीच | २८ |
| २८ | सरलि अता यामिनी | २९ |
| २९ | असह्य जीवन | ३० |
| ३० | बोले हा कधि तरि बाई ? | ३१ |
| ३१ | उपासना | ३३ |
| ३२ | जीवित क्षणभंगूर ! | ३४ |
| ३३ | श्रीविवेकानंद वंदन | ३५ |
| ३४ | विरंगुळा | ३६ |
| ३५ | अभंग | ३७ |
| ३६ | गोड वेड | ३८ |
| ३७ | गत विभव | ३९ |
| ३८ | कधी ? | ४० |
| ३९ | फुलवेल | ४१ |
| ४० | वनबाला | ४२ |
| ४१ | अंगाई | ४३ |
| ४२ | सांजवात | ४४ |

# निवेदन

गेल्या पांचसहा वर्षांचें अवधीत लिहिलेल्या कांहीं भावगीतांचा हा प्रथम संग्रह प्रकाशित करताना मला अननुभूत आनंद होत आहे. तरी पण याचें श्रेय माझें गुरुवर्य 'गिरीश' यानाच आहे. त्यांचा प्रेमळ सहवास व 'स्नेहधारा' लाभल्या नसत्या तर कदाचित ही मंद 'सांजवात' आज उजळू शकली नसती. या संग्रहात निवडलेल्या कवितांपैकीं बऱ्याच कविता वेळोवेळीं नियत-कालिकांतून व कॉलेज मॅगेझीन्समधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. पुस्तकाचें कामी माझें कविमित्र श्री. रघुनाथ हर्डीकर व श्री. मुरलीधर देशपांडे (ओगलेवाडी) तसेंच श्री. शांताराम पाडगांवकर यांचें अमोल सहाय्य झाले आहे. त्याबद्दल त्यांचें आभारप्रदर्शन करणें हें औपचारिकच होईल. पुस्तकाचें मलपृष्ठ येथील आर्टिस्ट पाटकर यानीं अल्पमूल्य घेऊन सुबक काढून दिले, व फोटोब्लॉक्स 'श्रीपाद प्रोसेस वर्कस्' चें मालक श्री. श्रीपादराव कुमठेकर यांनीं आपुलकीनें करून दिलें याबद्दल दोघांचाही मी मनापासून आभारी आहे. येथील 'मौज' प्रेसचें मालक श्री. भागवत यानीं पुस्तक छपाई सुबक व आपुलकीनें करुन दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शेवटी, या 'सांजवाती' चें मंद तेज मराठी वाचकवर्गाला आल्हादकारक होवो एवढीच इच्छा !

नॅ. मेडिकल कॉ.
रेसिडेन्सी मुंबई.
१० मार्च १९३७

आ.

बाळ रानडे (नीलकण्ठ)

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | १ | आलेवर | आल्यावर |
| १५ | ५ | खचित | खचीत |
| १६ | १२ | चाकरी ! | चाकरी ! ' |
| २२ | ६ | हंसवी | हंसवी ! |
| ,, | ८ | उभवी | उभवी ! |
| ,, | १२ | झुलवी | झुलवी ! |
| ३४ | १८ | ज्वानी ज्वानीत | ज्वानीत |
| ३६ | १७ | गभरि | गभीर |
| ४१ | २ | शिपूनिया | शिंपूनिया |

# स्नेहधारा

माझे विद्यार्थीमित्र श्री. बाळ रानडे यांच्या 'सांजवातीला' स्नेहाची जोड देतांना मला एक प्रकारची आत्मीयता वाटत आहे. कारण 'बाळ रानडे' हें नांव ऐकलें, कीं माझ्या जुन्या गोड स्मृति पुन्हा जागृत होतात व डोळ्यासमोर, ती टुमदार फलटण नगरी, तें तेथील मराठा राजधानीचें वातावरण, तें शोभिवंत हायस्कूल, त्या समोरील ती सुंदर बाग, तीं निरामय चेहऱ्याचीं मुलें, त्यामध्यें वावरणारी बाळ रानडे यांची त्यावेळची छोटी मूर्ति व या सर्वांच्या आजूबाजूला घडलेले अनेक स्मरणीय प्रसंग, हीं सर्व उभीं राहतात, आणि मन क्षणभर तन्मय झाल्याखेरीज रहात नाहीं. जुन्या आठवणी या कांहीं दृष्टींनीं रमणीय असतातच; आणि त्याच वातावरणांतील आपल्या निरनिराळ्या प्रिय व्यक्तींच्या मनोमय भेटी होण्याचा योग आला असतां, कोणालाहि क्षणभर सुखसंवेदना होतेच. त्यांतहि आपल्या जीवनाशीं निकटवर्ति असणारी एकादी व्यक्ति कालांतरानें कार्यक्षम होऊन नांवारूपाला आली, कीं मनाला आपुलकीचें समाधान वाटतें; आणि असल्याच समाधानाच्या सुखानुभवानें मी आज या 'सांजवाती'ला स्नेहधारा घालीत आहे. माझ्या फलटणच्या निवासांत मला बाळ रानडे यांची काव्यप्रतिभा थोडथोडी दिसूं लागली होती व तिच्यांत पृथगात्मता आल्यास ती जनतेच्या मनाची पकड घेईल, असें वाटलें होतें. त्यांच्या ठिकाणीं वसत असलेलीं काव्यशक्ति त्यावेळीं पुष्कळशीं सुप्तावस्थेंत होती व आतां माझा तर्क आहे कीं शालेय विषया बरोबर ते आपल्या या आवडत्या विषयाचें त्यावेळीं गुप्तरीतीनें अध्ययन करीत असावेत. काव्यक्षेत्रांत लेखकाला प्रथम आत्मविश्वास नसतो म्हणून म्हणा; वा घरून प्रोत्साहन मिळेलच ही खात्री नसल्यामुळें म्हणा, उगाच लोक आपली चेष्टा करतील या भीतीनें म्हणा अगर त्या त्या विषयाचें अध्ययन करावयाचें असतें म्हणून म्हणा, त्याच्या गुणबीजाची पहिली वाढ बहुशः दृष्टी आडच होत असते. या बीजाचें पुढें रोप होईल, कालांतरानें त्यास फुलें बोंडे येतील, त्यांतून एकादी वात तयार होईल, तिला

स्नेहाकर्षण लाभेल व अंतःस्फूर्तीची ज्योत प्रज्वलित होतांच, ती प्रकाशमय होऊन कुठें तरी नंदादीपासारखी तेवत राहील, याची त्यावेळी कुणाला कल्पना नसते; पण ही एकप्रकारें नैसर्गिक क्रियाच असते. आवडीच्या विषयाचे चोरून अध्ययन करावयाचें, ही हि एक प्रकारची तपश्चर्याच आहे व ती बाळ रानड्यांनीं यथाकाल केली आहे.

दुसरा एक योगायोग मला गमतीचा वाटतो. मृताचें शवच्छेदन करून त्याच्या काळजाच्या सूक्ष्म गुंतागुंतीचें अध्ययन करणाऱ्यानें, जित्याच्या अंतःकरणाचें पृथक्करण करावें व त्याच्या मनोविश्लेषपणाचा चित्रपट रंगविण्याचा प्रयत्न करावा हा प्रकार, अपूर्व नसला तरी हृद्य वाटतो. असें योगायोग पाहिले, म्हणजे मेकॉले साहेबांच्या ' As science advances poetry declines' या तकलुपी विधानाचा पोळकपणा प्रत्ययास येऊं लागतो; आणि ज्या देशांत डॉ. टागोर व डॉ. बोस एकाच वेळीं जन्मास येतात किंवा जिथें डॉ. कीर्तिकर, डॉ. माधवानुज, किंवा डॉ. राईरकर यांसारखे वैद्यकवि जन्मास येतात त्या ठिकाणीं तो जनतेला कधींच पटला असेल. मला तर असेंच वाटतें, कीं आमची मराठी कविता खरीखुरी राष्ट्रीय व सर्वगुणसंपन्न व्हावयाची असल्यास, तिच्या सेवेसाठीं शारीर शास्त्रज्ञच काय, पण शिल्पकार, स्थापत्य विशारद, गायक, चित्रकार, गणिती, रसायन शास्त्रज्ञ, पदार्थ विज्ञानवेत्ते, भूगर्भ शास्त्रज्ञ, शिक्षणाभिज्ञ असे अनेक क्षेत्रांत कार्य करणारे कवि जन्मास आले पाहिजेत, व त्यांनीं आपापल्या शाखांतील ज्ञानानुभवाचीं काव्यमय बाजू रंगवून, मराठीला सजविलें पाहिजे. या दृष्टीनें पुढें डॉक्टर होणाऱ्या बाळ रानड्यांनीं आज कवितेकडे वळावें हा योग आशाजनक वाटतो.

या छोटया पुस्तकाच्या ' सांजवात ' या नांवांतच कितीतरी काव्य आहे. किंबहुना सांजवात हें एक काव्याचें प्रतीकच आहे, असें म्हटलें तरी चालेल. वातीला स्नेहाचा ओलावा म्हणजे पार्थिवाला मिळणारी अपार्थिवाची झरीच. हिचा ओघ कुठल्या तरी अदृश्य प्रदेशांतून सारखा वहात येत असतो व अंतरंगाच्या समईत ही वात स्फूर्तीनें प्रज्वलित होते. तिच्या ज्योतिपासून प्रकाश मिळतो व पुढला मार्ग उजळला जातो. या दृष्टीनें काव्य पुस्तकाचें ' सांजवात ' हें नांव साभिप्राय वाटतें.

श्री. बाळ रानडे यांची कविता आज संकलित स्वरूपानें जनतेपुढें प्रथमच येत आहे बालवयांतील आपल्या रूपाला स्थैर्य नसते. तें वेळोवेळीं बदलत असतें. कारण चांचल्य हाच त्याचा स्थायीभाव असतो. त्यामुळेंच सांजवाती-च्या प्रकाशांत आपणांस बहुविध रंग दिसतात. कोणत्याहि स्वरूपाला व भावनेला स्थ यित्व आलें कीं तिच्यामध्यें अभिजातता उत्पन्न होते. तथापि श्री. बाळ यांच्या कवितेला अजून स्थिराधिष्ठान लाभलें नसलें तरी ती त्या मार्गांत खास आहे, याची ‘ सांजवाती ’ तील कवितावरून आपणांस प्रतीति येते. जवळ बरीचशी सामुग्री झाली कीं प्राणी निवाऱ्याची जागा पाहूं लागतो व ती मिळतांच त्याचें सर्व चिंतन–मनन तेथून चालते. श्री. बाळ यांची कविता या अवस्थेंत आहे, हें आपणांस त्यांच्या निरनिराळ्या काव्योद्गारावरून सहज दिसेल. तें आपल्या आराध्य देवतेकडून ‘ आशीर्वाद ’ मागतांना म्हणतात.
‘ कांपते सारखी माझी जीवनज्योत ’ तथापि त्यांची इच्छा मात्र

‘ ही जळो स्नेहजा दारीं तुझिया देवी
नत होऊनि पायीं मीं ही गीतें गावीं ! ’

अशीच आहे. त्यांच्या ‘ सांजवाती ’ची ज्योत कंपत असली, तरी हा कंप भीतिगर्भ नसून प्रीतिगर्भ आहे. या वृत्तींतील त्यांचे विचार निर्मळ कृतज्ञतेनें भरलेले असून, त्यामध्यें एक प्रकारची जिज्ञासा असलेली दिसून येतें. वाचकांनी त्यांच्या ‘ उपासना ’’ ‘ कोण ! ’, ‘ वागीश्वरीवंदन, ’ ‘ गोड वेड ’ वगैरे कविता वाचून पहाव्यात, म्हणजे माझ्या म्हणण्याचें त्यांना प्रत्यंतर येईल.

श्री. बाळ यांना निसर्ग सर्वांत अधिक प्रिय आहे; कारण या संग्रहांत त्याच विषयावर लिहलेल्या सर्वांत अधिक कविता आहेत. या सर्वांमधून थोड्या अधिक प्रमाणानें ‘ईश्वरानें निसर्ग हें एक मोठें काव्य निर्माण केलें आहे; तच कवींची शाळा आहे’ हा सूर वाहात आहे. इतरत्र कधीं ते ‘सागरांच्या संपन्नतेंत रमतांना दिसतात, तर कधी ‘वासंत उषेशीं’ हितगुज करितात, कधीं त्यांना ‘ क्षितिजा ’ वरील तारेची निरनिराळीं सुंदर रूपें दिसतात, तर कधीं ‘ निझरांचे ’ खेळच पाहणें आवडतें, कधीं त्यांच्या दृष्टीला वादळवाऱ्यांतील भीषण सौंदर्य आकर्षून घेते, तर कधीं त्यांचें मन पारिजाताच्या सुंदर पखर-

र्णांत रमतें. सारांश, निसर्गाच्या बाबतींत त्यांची भूमिका सौंदर्य–समीक्षकाची आहे; ही वृत्ति कायम राहिली, तर लवकरच ते सौंदर्य संशोधकाची भूमिका घेतील, अशी आशा वाटते.

निसर्गाच्या खालोखाल ' मातृप्रेम ' ही श्री. बाळ यांची आवडती भावना आहे. कवीच्या अंतःकरणांतील संवेदना व तद्भव खळबळी निरनिराळ्या मार्गांनीं बाहेर वाट काढीत असतात व त्यांवरून एकाद्या विशिष्ट बाबतीत त्यांची वृत्ति कोणत्या स्वरूपाची आहे हें त्यांच्या प्रस्फुट पुनरुक्तीवरून सहज समजतें. श्री. बाळ यांची मातृप्रेमाच्या बाबतींत अशीच स्थिति आहे त्यांचा.

' माउली परी न अन्य या जगांत देवता
पांग हे तिचे अनंत यायचे न फेडतां '

असा विश्वास आहे. आपल्या बाळापायीं माय वेडी होते, हें पाहिल्याबर ते ' माया ही वेडीच गडे ' असे तिचें समर्थन करतात, आणि म्हणूनच ' ध्रुव बाळ ' रुसून वनांत गेलेला पाहून ते आईच्या करुण वाणीनें त्याला ' राजसा ! ' म्हणून कळवळून हाक मारतात. तान्हा झोपी गेला असतां त्याच्याकडे एकसारखें तन्मयतेनें व कौतुकानें आई कशी पहाते, याचें चित्र त्यांच्या मनाला वेधून घेते व एकाद्या गरीबाच्या खोपटींत फटींतून येणारा गार वारा निजलेल्या तान्हुल्यास लागला, कीं त्याचें अंतःकरण आईच्या संव्यथेनें थरथरूं लागतें व बाळाला ' अंगाई ' गातें. त्यांच्या या विषयावरील कवितांतून येणारे गरीबीचें किंवा पोरकेपणाचे उल्लेख हृदयस्पर्शी असून, ते त्यांच्या जीवनाशीं समरस होऊन निघाल्या सारखे वाटतात.

या संग्रहांत कांहीं प्रेमिक भावगीतें व नाट्यगीतें आहेत, पण आहेत तीं श्री. बाळ यांच्या प्रवृत्तीची द्योतक आहेत. प्रेमिक भावना रेखाटतांना प्रिय व्यक्तीचें मूक भावगीत ऐकण्यांत आपणांस 'विरंगुळा' वाटतो, असें ते म्हणतात, तेव्हां या विषयाची सात्विक बाजू आपणांस प्रतीत होते. असलें प्रेमगीत त्यांच्या अंतःकरणांत सारखें निनादत असतें व त्याचें मूक संगीत ऐकण्यांतच त्यांच्या अंतर्जीवनाची तृप्ती होते, असें आपणांस आढळते. ते प्रिय व्यक्तीला

' तूं तमिस्र–जीवनीं
चांदरात, मोहिनी '

असें संबोधतात व नंतर

' जीवनांत बिंबु दे अशीच माझिया कला '

अशी इच्छा प्रदर्शित करतात. मात्र या भावनेच्या चित्रणांत बहुविधतेचा अभाव असलेला जाणवतो.

याखेरीज कांहीं कविता टीकात्मक स्वरूपाच्या व कांहीं राष्ट्रीय वृत्तीच्या आहेत. टीकात्मक कविता चुरचुरित व उद्‌बोधक असल्या तरी त्यांत जात्याच काव्यांश कमी असतो. तथापि त्यांची ' कवि आणि शेतकरी ' ही कविता वाचकांनीं अवश्य वाचून पहावी; विशेषतः आजच्या शहरांतील कविवर्गाला ती खात्रीनें मार्गदर्शक होईल. राष्ट्रीय कविता जळजळीत असल्याखेरीज अस्सल वाटत नाहीं, तथापि ' गतविभवा'सारख्या कविता थोडे फार समाधान देतात.

या ' सांजवातीचें ' साधारणपणें स्वरूप कसें आहे हें येथवर सांगितलें. फलटणच्या माळरानांत काव्य पिकतें कीं नाहीं, हें जरी निश्चित सांगतां आलें नाहीं, तरी तेथें काव्यविषय खास पिकतात, हें मी सांगूं शकतों; आणि म्हणूनच या सांजवातीतील पुष्कळ कवितांचें पोषण तेथून झालेलें आहे असें मला अभिमानानें म्हणावेसें वाटतें.

श्री. बाळ यांची वृत्ति संस्कारक्षम व अभ्यासू असल्यानें, त्यांची कविता एकसारखी प्रगतिपथावर आहे. वाढत्या अनुभवानें व अभ्यासानें ती अधिक तेजस्वी होईल असा मला विश्वास वाटतो. प्रथमच ' सांजवात ' लावण्यामध्यें त्यांनीं ' तमसो मा ज्योतिर्गमय ' ही आपली आंतर प्रार्थनाच व्यक्त केली आहे. ' सांजवात ' झालीच आहे; आतां ' शुभं करोति ' म्हणण्यापलीकडे काय उरलें ?

९ फेब्रुवारी १९३७<br>
पुणे शहर

गिरीश

# कविते !

[ वृत्त द्रु. वि. ]

रसिक-रंजनि मंजुळभाषिणी
करित मी चतुरे तव योजना

त्वरित गे ललिते मधुहासिनी
हरुनिया श्रम तूं रिझवी मना.

हसुन गाउन तूं मधु गीतिके
विसरवी क्षण या कटु जीवना

रसिक मानसिं तूं मधु चंद्रिके
विहरुनी करि अमृतसिंचना

रसिक कीं जमलेच मिलिंद हे
सहज तूं सुमनासम कोमला

मिसळुनी स्वनभावरंग हे
तव हृदीं मधुसंगम जाहला

कर सखे मधुसिंचन माधवी
नच परी करि गे कधि वंचना !

# वागीश्वरी वंदन

[ सुनीत-मंदारमाला ]

जगीं कल्पुनी देवि मंदीर तूझें असे चालले ज्ञानसंकीर्तन
किती पातले पूजनीं पायिं तूझ्या इथें सानथोरादि विद्वज्जन
कुणी अर्पिली पारिजातादिकांची तुला मालिका गोजिरी मोगरी
कळ्या कोवळ्या वाहतो पायिं तूझ्या जगन्माउली मानुनी स्वीकरी.
असे नित्य वाणीत ज्यांच्या जिव्हाळा तयांनी दिली ज्ञानरुपी सुधा
तयांचे तरी पांग फेडू कसे मीं? घडो अल्प सेवा अशी ही सदा
सदा वाहते काव्य-मंदाकिनी जी गिरीशातुनी हिंदभूमीतली
तिच्यातून काढून मी बिंदु-माला तिच्या माजि टाकीत ही अंजली
मयूरादिकानीं तुला आळवीले प्रसादें तुझ्या होई केकावली
प्रभेनें तुझ्या बिंदुमाला जलाच्या न होतील कां रम्य मुक्तावली?
मती मानवी रुप वानू शकेना तुझे शारदे मोहवी जें सुरां
उगी कातळातून हा पाझरे कां? प्रसादाविना वाग्यशाचा झरा
मना मंगले लागली आस तूंझी कृपेची तुझ्या गे, असो सावली
यशोदेवि वागीश्वरी! नीलकण्ठें तुझे पायिं ही वाहिली अंजली.

# आशीर्वाद

( भू. वै. सुनीत )

मम साद ऐकुनी घेशिल कां गे दाद ?
मागतो देवते ! तुझाच आशीर्वाद.
मंदिरीं तेवती दीप तुझ्या तेजाळ
ही मंद दारची ' सांजवात ' सांभाळ
बाहेर शिशिर अति सुटला झंजावात
कांपते सारखी माझी जीवन ज्योत
घेऊन मुठीमधिं जीव इथें मीं आलों
तव प्रभा मंगला पाहुन अंतरिं धालों
ही जळो स्नेहजा दारीं तुझिया देवी !
नत होउन पायीं मीही गीतें गावी
ह्या अनंत इथल्या तेजोमय ज्योतीत
जाउदे सान ही विलीन होउनि त्यांत
लाभता देवते मंगल आशीर्वाद
घुमवीन मंदिरी मधु-गीतांचे नाद !

# माउली

माउली परी न अन्य या जगांत देवता
पांग हे तिचे अनंत यायचे न फेडता
अश शैशवी जिनें
पोसले सुधाकणें
धन्य वाटते जिवास चरण धूलि वंदता १

काढुनी मुखांतला
घास देइ प्रेमला
प्रेममूर्ति मंगला म्हणून विश्ववंदिता २

अल्प लागता मला
दुःख होतसे तिला
दिव्य प्रेम हे निरीच्छ एक येइ सांगता ३

दैवते किती तरी
जगति वन्द्य या जरी
माउली परी न कोणि लाभतेच शोधता ४

आज मी जगीं जरी
ज्ञानवल्गना करी
'श्रीगणे' दिला तिनेच शारदाच तत्वतः ५

बाळ बोल बोबडे
गोड मान तूं गडे
त्वत्कृपा असो सदाच अंतरी प्रसन्नता ६

# सागरा !

[ प्रणय प्रभा ]

जलदास देसि जीवन-धारा
श्रीमंत सागरा तूंच खरा ॥
संपदेस तव सुरहि लोभले
अमृत-मंथन त्यांनीं केलें
अमोल रत्नां काढुन नेले
तरि काय उणे कोषागारा ? १

अनंत सरिता धावत येती
आलिंगन तुज प्रेमें देती
एकरुप जणु जीवनिं होती
शोभसि भूपति तूंच खरा २

रत्नाकर जगिं तुलाच म्हणती
अनंत मौक्तिक काढुन नेती
तरी तुला नच त्याची खंती
उदारधी तूं सरिद्धरा ३

इंदु उगवतां येते भरती
प्रेमवीचि तव हृदीं उसळती
उचंबळुनि जणु वृत्ती येती
भावकवी तूं जगीं खरा ४

कधीं खवळता वादळ वारा
दर्यासारंगाचा तोरा
उतरविसी दावून दरारा
शासतोस उन्मत्त नरा. ५

# वासंत उषा

दारीं बहरली मधु-मालती
पवन करित मंद श्वसन
अलि करिती मधु-गुंजन
कोकिळाहि करि कूजन
मंजु या वसंतीं १

येइ उषा मंद हसत
विहग-वृंद मधुर गात
अरुण प्रभा विस्फारत
जाइ ही दिगंतीं २

लपत छपत कुंजातुन
मंद मंद येइ कोण ?
रुम झुमती मधु-पैंजण
कानिं नाद येती ३

येइ निकट स्वर मोहिनि !
होउ गुंग प्रभु-गानी
वाहु मिळुनि प्रभुचरणीं
सुमनरूप प्रीती ४

# पोरकें पोर !

( जाति फुलवेल )

पोरकें पोर
        कौतूक कोण करणार ?
ममतेनें द्या भरवुनि घास
आणि उबेची देउन कूस
गुल गुल गोष्टी सांगुन त्यांस
        थोपटणार                १
कधीं खेळता लागे पडुनी
कोण्या नयनीं येइल पाणी ?
आणि शांतवी प्रेमळ वाणी
        करुन उपचार                २
बाळ मनाचा हट्ट पुरवुनी
मुका घेउवी गोंजारुनी
प्रेमसुधा त्यां कोण पाजुनी
        शांत करणार ?                ३
पुढती जेव्हां शत्रु मर्दुनी
रणीं यशोधन येइ जिंकुनी
कोण न्हाणि त्यां प्रेमाश्रूंनीं
        धन्य होणार ?                ४

# प्रतीक्षा

[ प्रणय प्रभा ]

( पतिराज परगांवी दोन दिवसांची मुदत मागून कामासाठीं गेलें परंतू मुदत संपली तरीही घरीं न आल्यामुळें पत्नी वाट पहात आहे. )

भासति हे दिन युगापरी
परत कधीं येणार तरी ?
अजुनि न कामें काय जाहली ?
दो दिवसांची मुदतहि सरली
रीत काय तरि बाई असली
शून्य सदन हो वनापरी ! १
पिंजऱ्यातल्या पोपट मैना
घेति न आनंदानें ताना
मधु-मालति ही मुळी हंसेना
उदास वाटे सर्व घरीं ! २
बाबु सारखा हाक मारतो
भरवित असतां घास न घेतो
दुडदुड दाराकडे धांवतो
सुने सुने वाटते घरीं ! ३
मोटारीचें शिंग वाजतां
अंतरातलें ये न सांगता
परि 'नाहित हो !' कुणी सांगता
मन चिंती तें नच वैरी ! ४

# माझे भाग्य

[ आपणाला प्रिय व वन्द्य माणसें घरीं आलेवर मनामध्यें जे समाधान व आनंदाचे तरंग उठतात ते या कवितेत व्यक्त केले आहेत. ]

आपले पाय घरा लागले
मातीचें गरिबाचें घर हें सोन्याचे जाहलें
जाहले मंगल हें जीवन
अमृत-वाणी आपुली होतां प्रेमानें सिंचन
अंगणी कुंद जुई मालती
बहरुनि नाचति आनंदानें प्रेमानें डोलती.

आपल्या आशिर्वादे अहा !
भिकारड्या या झोपडिचा हो क्षणांतरी स्वर्ग हा
राजसा अंतर कधि द्या न या
निर्माल्याचें भाग्य लाभुं द्या चरणी सुमनास या
नांदते मंगल शांती घरीं
महद्भाग्य हें आज स्थापितो मूर्ती हृन्मंदिरी
जाहले पूर्ण समाधान
गरिबाचें हें तुम्ही चाखतां प्रेमानें भोजन.

आपले पाय घरा लागले
पूर्व जन्मिचें भाग्य काय हें उदयोन्मुख जाहले ?

## वेडी शंका

जाति [ प्रणय--प्रभा ]

मनिं येइ कशी वेडी शंका
सोनुले तुला मी विसरिन कां ?
कधिं न आजवरि अलग राहिलों
आनंदानें हसलों रमलों
ह्मणून आपण दोषी झालो
पाहवले दैवा नच कां ? ॥ १ ॥

पूस आसवें, खिन्न न हो मनिं
प्रार्थी प्रभु आनंदे स्वमनीं
सरतां ही अवसेची रजनी
येइ न कां फिरुनी राका ? ॥ २ ॥

वाढो अपुल्यामधलें अंतर
परि प्रीतीला येइ न अंतर
मनें आपुली निकट निरंतर
लाडके नको तूं करु शोका ॥ ३ ॥

हसुन राजसे ! निरोप देई
अगदि न अंतरिं कष्टी होई
कोंमल कलिके हसुनी राही
दे अखेरचा मज मधुर मुका ! ॥ ४ ॥

सं. काव्य क्र. ३४५
ता. ८।८।३७
अ.जे.

# भाव-संगम

( जाति-बांसरी )

गायनांत रंगता मला न ठाउकें मुळीं
येइ मागुती उभी सुहास्य मंद पाउली
हृदय होइ मूक बीन
गाइ प्रेमगीत करुण
येथ मानिनी कशी चुकून आज पातली ?
नयनांतुन ओघळून
मोत्यांचें सर तुटून
ती सुधार्द्र चंद्रिकाच शारदीय भासली
प्रेमगीत रंगलें
शब्द सर्व थांबले
एकभावसंगमात रागिणीच डुंबली
निकट येउनी तिनें
अश्रु-पूर्ण लोचनें
स्कंधि मान टेकली, तशीच शांत बैसली
निकट डाहळीवरी
रान पाखरांपरी
बैसलो कितीक वेळ शब्द ती न बोलली
तोंच जीवनातले
सुखद स्वप्न संपलें
आणि भावसंगमांत प्रेममूर्ति लोपली

# क्षितिजावर

चाल ( वंदन तुज मायभूमि )

कोण येइ क्षितिजीं ही विमल तारका
विश्वाची आदिशक्ति सानरूप कां ?

सोज्वळ ही काव्य-कला काय वाढती
इंदु-कला दूति काय ही प्रभावती ?

शुक्राची संजिवनी सौम्य तेवते
पूर्वेचें सात्विक कीं तेज दाविते !

तेजस्विनि अभ्रातुनि येइ कोण ही ?
संहरुनी तम सारा उजळते मही

उगवत ही कोण अहा ! विमल चांदणी
चमचमते कोंदणांत काय हिरकणी ?

सत्कविची स्फूर्ति-ज्योत काय जागती
नत होउनि आळविते ही सरस्वती ?

जाळुनिया आत्मतनू ज्योत तेवते
भारतीय आर्या कुणि तेज दाविते !

# निर्झर

[ चाल तुतारीची ]

खडकाळीतिल माझें जीवन
संथपणाचा माहित मार्ग न
रम्य वाटतें मला स्वैरपण
बालपणीचे अल्लड वर्तन
मज मानवते मुळी न बंधन ॥ १ ॥
छायेतुनि तर कधीं उन्हांतुन
काटेरी वा जाळीतून
माळरान कीं असो रम्य वन
सांज सकाळीं वा रात्रंदिन
गात हिंडतो असाच वणवण ॥ २ ॥
रानफुलें कांधें काठावरती
दूर्वांकुर ही कुठें उगवती
फूलपाखरें हिंडत येती
सवंगडी हे माझे होती
दंग त्यामध्यें जातो होउन ॥ ३ ॥
वाटसरू कांधें तो तान्हेला
निदाघ काळीं चुकुनी आला
पिउनि तदा जर ओंजळ धाला
क्षण गाणें मम ऐकत बसला
मार्ग चालतो पुन्हां हुषारुन ॥ ४ ॥
रान पाखरुं कांधें चिंव-चिंवतें
म्लान होउनी जवळी येते
चोंच भरुनी हुषार होते
उंच भराऱ्या मारित जाते
तेव्हां जातो मनिं आनंदुन ॥ ५ ॥

धन्य तदां मी मनांत व्हावे
फिरुनी नाचत नाचत गावे
गातां जीवन निर्मळ व्हावे
सरितेमध्यें मिळून जावे
अन्य वाटते भाग्य न याहुन ॥ ६ ॥

# माया ही वेडीच गडे !

( चाल—झपूर्झा )

' ठाउक आहे कां कोणा ?
नेला कुणि माझा कान्हा
नव्हते पाजियले त्याला
पदरांतुनि तों कुणि नेला ?
नेला कोणी ? बोलाना !
बोलत तुम्ही नाहीं ना ?
नका नका हो असं करूं
द्या ना माझं लेकरूं
बाळ माझं उपाशी '
गेली धांवत दाराशीं
हसतां हसतां मधें रडे
दूर जाउनी पुढें पडे
ओढ लागली बाळाची
वेडी झाली जन्माची
कधीं ओरडे हसें रडे
माया ही वेडीच गडे !

# पाखरा !

जाती अवनी

गात उंच अंबरिं घे पांखरा भरारी
तोड बंधने जिवास नित्य जाचणारी
पंख सानुले जरी
उडुनि तरी वरचेवरि
अवनि भोंवतीं खचित मारशील फेरी १

मंजुळ तव गान मनीं
गमते स्वर-संजिवनी
हृदय खोलुनी तरी घेइं तूं लकेरी २

गात इथे थांबसि जर
स्वातंत्र्या मुकशिल तर
हे तयार पंजर तुज पकडण्या रुपेरी ३

पुष्पकसा संचर वर
नीलांबरि करि विहार
वाक्शर जन ना तरि तुज टोचतिल दुधारी ४

अरुण स्वागतास नभीं
देवि उषा नटुन उभी
पांखरें सुरांत गाति अरुण गीत सारी ५

बैसवून पंखावरि
नेइ मला व्योमांतरि
मुक्तकंठ ऐकव मज स्वर्गिंची लकेरी ! ६

# कवि आणि शेतकरी

( केशवकरणी. )

[ शेतकऱ्यांचे कष्टमय जीवनाविषयीं विचार न करता व त्यांचे हालातील राहणीचा अनुभव न घेता बरेच कवी जानपद गीते लिहितात, परंतु त्यांत शेतकऱ्यांचे विषयी जिव्हाळा फारच थोडा असतो. त्यांच्या जीवनाचे दुरून परीक्षण करण्यापेक्षा त्याचा थोडा-तरी अनुभव घेऊन मग लेखणी चालवावी अशी कविमित्राना प्रेमाची सूचना आहे. ]

बंगल्यांत बैसून सुखानें करतो कविता कवी
जानपद गीतें गातो नवी
शहरामधिं राहून वानितो खेड्यांची थोरवी
रसिकही मान तया डोलवी

सांगतो ' सुखाची मीठ भाकरी बरी
धनिकांची करणें कशास ती चाकरी ?
वानितो राहणी शेतकऱ्यांची बरीं
परि काय, तयाला शेतकऱ्यांची खरी स्थिती आकळे ?
सुखाचे दुरून दिसती मळे ॥ १ ॥

लांबून वाटते खोप तयाची बरी
बैसला सुखानें वाटे बांधावरी
परि दुपारची तो खंत करी अंतरीं
पाउसवारा ऊन साहुनी खपतो शेतावरी
उपाशी पोरें रडती घरीं ॥ २ ॥

जर सारा भरण्या पीक पडेना पुरे
गुजरण्या वर्ष मग काय तयाला उरे ?
नेतात कसाई खेचुन त्याची गुरें
बाइल-पोरें गरिब विचारी रडति भुकेली घरीं
तगादा सावकारही करी ॥ ३ ॥

आंसवा बरोबर गिळतो तो भाकरी
फाटकें घालतो कुडतें अंगावरीं
पोसतो कशी तो कच्चीबच्ची घरीं ?
अर्धपोटि राहून राबतो अपुल्या शेतावरी
कल्पना कोण तयाची करी ? ॥ ४ ॥

हे काय सुखाचें जीवन त्याचें तरी
परि परिस्थितीची जाणिव कोणा खरी ?
कळवळा येउनी मदत कोण त्यां करी ?
' जावे वंशा तेव्हां कळते सुख त्याविन ना खरें
दुरुनिया डोंगरही साजिरे !' ॥ ५ ॥

# न्याय ?

[ दिंडी ]

कुणी रात्रंदिन राबतो बिचारा
म्हणें कांहीं ना थंडि ऊन वारा
अर्ध पोटीं, ना वस्त्र पूर्ण त्यायां
निवाऱ्याला त्याजला वृक्ष–छाया ॥ १ ॥
कधीं राहे तो पूर्ण उपाशीच
कशाचें हें आयुष्य ? त्यास जाच
जया द्रव्याची नसे मुळी वाण
तया देशिल तूं स्वयें लाख होन ॥ २ ॥
घरीं वेश्यांच्या खैर भूषणांची
तलम उंची जरतारि पैठण्यांची
शीलवतिला ना अंग झांकण्याला
वस्त्र पुरतें तें लाज राखण्याला ॥ ३ ॥
घरी ज्यांच्या खाण्यास नसें कांहीं
मुला बाळांची वाण तिथें नाहीं
जिथें सौख्याची उणिव नसें कांहीं
'मूळ सौख्याचें मूल' तेथ नाहीं ॥ ४ ॥
कुणी जाया लागला सत्पथानें
त्वरे होतो तो ग्रस्त संकटानें
चांगल्यांचे ना चीज जगीं काय ?
असा विपरित हा कसा तुझा न्याय ? ॥ ५ ॥

# राजसा !

( पाखरा येशिल )

[ ध्रुवबाळ रुसून वनांत गेल्यामुळें त्याच्या. आईनें केलेला विलाप ]

झाले तें विसरून राजसा येइं झणी परतून ॥ धृ० ॥
कानर्नि जासी रागावुनि तूं
राजपुत्र परि अनवाणी तूं
आईला निज सोडुनिया तूं
घासहि ना घेऊन । राजसा ॥ १ ॥
घास गोड ना लागे मजला
जीव सुखाला साऱ्या विटला
ध्रुव राजा मज सोडून गेला
वैभव हे टाकून । राजसा ॥ २ ॥
सवतीनें तर दावा धरिला
मांडी वरुनी बाळ ओढला
दैवानेही डाव साधला
जाइ जीव झुरून । राजसा ॥ ३ ॥
एकटांच तूं घोर काननीं
पाडस मम तूं चुकता रानीं
हिंडुन मूर्छित होतां दमुनी
रक्षी कोण जपून ? राजसा
मागशील ते देतिल तुजला
राजहंस मम कां मग रुसला ?
जीव सख्या रे वेडा झाला
माझ्यासाठि म्हणून । राजसा ॥ ४ ॥
घास एवढा भरवुनि घेई
अढळपदीं वा प्रभुपदि जाई
मागे इतुके वेडी आई
पाहिन नयन भरून । राजसा ॥ ५ ॥

# संक्रमण

[ प्रणय प्रभा ]

नैराश्य लोपले पार मनीं ॥ धृ० ॥

लाभली मला नव संजिवनी
ओहळ झुळु झुळु गाउ लागले
वासंतिक मग वारे सुटले
नील गगन मग विमल हासले
जाहली सकल ही नव अवनी ॥ १ ॥

हंसरी सुमनें डुलूं लागली
कुंजी किलबिल चालू झाली
सुमबहरानें नटल्या वेली
ये मधुर उषा सरुनी रजनी ॥ २ ॥

इन्द्रधनू ये सहजीं हाता
स्वप्नातिल हो सत्य रम्यता
नव चेतन ये सहजी चित्ता
रंगल्या कल्पना तरल मनीं ॥ ३ ॥

बोल बोबडे मधु बालांचें
अर्थ गूढ मग कळले त्यांचे
मुग्ध भावही मुलाफुलांचें
मज स्वर्ग वाटतो या सदनीं ॥ ४ ॥

५६२९

# वादळ वारा

घोंघावत ये वादळ-वारा
फेसाळवि हा दर्या सारा
थरथरती ह्या नारळि तीरी
कांपतसे जणु वेळा सारी
डुलती नौका जललहरीवर
धीट परी हे गाती धीवर
वाऱ्याचा बसताच सपाटा
उठती खवळुन नागिणि लाटा
सरसर वेगें पुढती जाती
दीपस्तंभा टक्कर देती
धो धो त्यांचा नाद येतसे
नाद परी तो भेसुर भासे
अंबरिं कांपत सायंतारा
खलाशीच कीं कुणी बिचारा
वादळांत हा चुकुन सापडे
अंतर त्याचे जणू धडधडे
किती दिसे हा केविलवाणा
वादळातला धीवर-राणा
घोंघावत ये वादळ-वारा
दाखवितो अपुलाच दरारा

# कोण ?

नाजुक ह्या जाइ जुई
कोण गडे हा फुलवी ?

काळि पाना आड पहा
कोण दडुनि हा डुलवी

स्वप्नामधि मुग्ध उषा
कोण तिला मधु हंसवी

कोण किरण मंदिर हे
अवनीवरती उभवी

भावमधुर बोल सखे
हृदयाला हे भिडवी

आंदोलन स्वन मय हे
कोण मनाला झुलवी

फुलल्या ह्या कुंदकळ्या
प्रेमगीतिकाच नवी

तोच किरण आज कसा
त्यजुन सुमन हे सुकवी ?

मृगजल कीं भास जसा
नयनाला हा फसवी

# बुवाबाजी

## ( जाति अवनी )

[ मंबाजी बुवा प्रमाणें भोंदू बुवाची बुवाबाजी श्री तुकाराम ज्ञानदेव वगैरेंच्या कालापासून चालत आलेली आहे. समाजाला अत्यंत विघातक अशा या भोंदू बुवावरच ही टीका आहे. खरे सत्पुरुष फार थोडे, आणि त्यांत श्री समर्थ रामदास प्रमाणे तर विरळेच ]

माजविती जगति बुवा व्यर्थ हे पसारे
शेंदरले दगड काय देव होति सारे?
करुन काहि धर्मखूळ
फेकिति डोळ्यांत धूळ
जनतेची करिती भूल
राखळले वरुन परी अंतरी निखारे १
दाखवतो देव म्हणुन
चमत्कार निज दावुन
आत्मस्तुति माजवून
मयुरांचे लावतात काक हे पिसारे २
सांगतात द्रव्य पाप
गिळती मारुन थाप
मंडुकास जेवि साप
पाडति फाशि अज्ञ जनां स्वार्थ साधणारे ३
भाव तिथें म्हणति देव
अंतरांत स्वार्थ भाव
पापाला येथ वाव
परि फुटता पेव कधी बिंग कळे सारे ४
वेदांती इतर व्यर्थ
सगळे ना जागिं 'समर्थ'
जीवन निज करुन सार्थ
राष्ट्रामधिं चेतविले अन्य जये वारे ५

दीनांची ज्यांस कीव
ओलांडाति स्वार्थ शीव
संत तेच तेच देव
भूतदया तत्व इतर फुकट बोलणारे ! ६

## देवाचिये दारी

[ अभङ्ग ]

देवाचिये दारीं
उभा दिसभरी
राम-कृष्ण हरी
बोलतो तो.
देवाचिये दारीं
उभा जन्मभरी
जसा रीणकरी
देवाचा तो
पै पैसा मागे
देती जन ते घे
जाळी पोट, जगे
कसा तरी
देवाचिये दारीं
उभा हा भिकारी
मुक्ति काय चारी
साधतो तो ?
पोटाचीच सोंगें
चालतात जगीं
बोलतात उगीं
परमार्थ !

# पारिजात

( भास–गिरीश )

गालिचा पारिजाताचा झाला या अंगणीं
तारका नाचुनी साऱ्या
निशि नभांत लुकलुकणाऱ्या
एकेक येथ येवोनी निजल्या की भागुनी
कीं उषा–अरुण दोघांनी
सुमरत्नें स्वर्गोद्यानीं
उधळली त्यातली कांहीं पडली ही येउनी
अंगाई करती दमली
बालके खेळुनी आली
ही देवाघरची काही सुमरुपे घेउनी
ग्या हंसुनी सुम–बालानो
मूर्तिमंत सौंदर्यानो
निर्माल्य जाल होऊनी रवितापें पोळुनी
मधु गंधोच्छ्वासें तुमच्या
वेडावति वृत्ती मनिच्या
मम मानस मधुपे जावे गंधाला लोभुनी
कुरवाळुन हृदयी धरता
कोमेजुन तुम्ही जाता
ठेवण्या योग्य जागा ना प्रभु–चरणा वाचुनीं

# आजकालची पोरें

[ प्रणय प्रभा ]

ही आजकालची जरि पोरें
सामर्थ्यहीन नच समजा रे !
आम्ही न अजुनी पिकली पानें
झडून जाया हिम-वाऱ्यानें
ताजे अगदी अम्ही दमानें
नव रक्त असें सळसळणारें॰ ॥ १ ॥

आज कालचे अंकुर सारें
जोपासुनि तर तुम्हि वळवारे
प्रगति प्रेम पय त्यां शिंपारे
लवतील यथाक्रम फलभारें. ॥ २ ॥

आज अम्हा जरि गणता पोरें
तरी उद्याचे सैनिक सारे
यातुनि निघतिल राष्ट्रमोहरे
ढाळाल अश्रु मग प्रेमभरें ॥ ३ ॥

नवमतवादी कोण न होते ?
नव्या जुन्यातिल सत्य न मरते
हेम कधींही जुनें न होते
परि लावुनिया कस ते घ्यारे ॥ ४ ॥

नवें जुनें हा वाद कशाला ?
काल न हटला कधि कोणाला
अभिवादू तर नव्या युगाला
जुनें नवें मिळुनी सारें ॥ ५ ॥

# कवींची शाळा

[ सुगीत शा. वि. ]

ज्यानी आत्मबळें सुतेज दिधले काव्यासही सोज्वळ
त्यांचे साठविण्या प्रबंध अपुरे सौंदर्य विश्वातिल,
देते जाग उषा विहंग उठुनी गातात सारे मुदे
येती सर्व ऋतू फुलून वनही वासंति आनंद दे
येतो बालरवी जगास जगवी देऊन संजीवन
संध्या रंगमया सजे हिरकण्या अंगावरी लेउन
शाळेमाजि अम्हास दिव्य असल्या ज्यानें असें धाडले
केली स्थापन केधवा ? न कळले कोडेच तें राहिलें
भिंती बांधुनि चार त्यांत बघतो विश्वासि सामावया
शाला संकुचिता तिच्यात बघतो सर्वज्ञही व्हावया
होते हेम जरी करुन किमया कृत्रीम मोती हिरे
नाहीं होत कवी करुन कधिही ताऱ्यापरी ते खरे
विश्वीं सचरुनी धडे कटुमधू घ्यावे तया लागती
पाठीची पुरणार अल्प, असल्या मार्गीं शिदोरी न ती !

## अवेळीच

(चाल–'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस' (कै. गडकरी) सारखी)

अवेळीच कां सुकसी कलिके मंद जराशी हांस
किरण कोंवळे मधु–सोनेरी
लव पवनाच्या येती लहरी
नाचति डुलती सुमने सारी
तूच बाई कां अशी उदास ? १

दिवस चालला किती भरारा
जीवन होई तप्त सहारा
मंद स्मित तव जीवन धारा
पाज शांतवी भग्न–जिवास २

घाम घाम हा होइ जिवाचा
कोरड पडते बसते वाचा
प्रवास पुढती होइल कैचा ?
संजीवनि तूं एक जिवास ३

सुरवल्ली मी इथें लावली
बहरुनि तिज ही कलिका आली
उधळिल गंधा हसुनी गालीं
फोल काय ही होइल आस ? ४

हांस एकदा मंद लाडके
कुरवाळिन तुज हृदी कौतुके
हृदय भुके मम राहिल कलिके
घालिन कंठी मम कर पाश० ५

# सरलि अता यामिनी

( संगम )

[ लॉर्ड टेनिसनच्या 'Come into the garden Maud च्या आधारें ]

चल सखे झणी उपवनीं राजसे !
सरलि अता यामिनी.
हा मंद पवन वाहतो
मकरंद दूर पसरतो
आमोद दरवळे वनीं राजसे. १

ना कोकिल कूजन करी
बैसून रसाला वरी
तव वाट पाहतो मनीं राजसे २

हा हंस न क्रीडा करी
थांबला तरंगावरी
जणु उदास होई मनीं राजसे. ३

ना कुंदकळ्या उमलती
अरविंद जुई मालती
दे ऊन तया येउनी राजसे ४

हा गुलाब कलिका किती
पण अजून ना उमलती
ही निराश हो कमलिनी राजसे. ५

थांबल्या सखे सारिका
हा गुलाब पडला फिका
दे जीवन त्या येउनी राजसे. ! ६

# असह्य जीवन

( प्रणय प्रभा )

( पिंजरातल्या पाखराचें जिणें )

संगीन रोखली उरावरी
तरवार लोंबते शिरावरी
पाखरास जों पंख न फुटले
तोंच पंजरी त्यांस कोंडले
धडपडुनी जर तें चिवचिवलें
गान नव्हे ते खरोखरी. १

असह्य असले जिणे कंठणें
स्फूर्तिनिर्झरा ह्रदी कोंडणें
वाफारुन मग अंतरि कढणें
स्वैर वाहणे कुठुनतरी. २

परवशतेच्या जीवनांत या
कंठ मुक्तता होई कां सया ?
म्हणुन उमाळा दाबुन ह्रदया
बांध घालतो परोपरी. ३

बंध काचते सारे तोडुन
वैनतेय हा पंख उभारुन
पन्नग-मस्तक कधीं विदारुन
स्वर्गावरती झेप करी ? ४

# बोले हा कधितरि बाई ?

[ तान्हुल्या भावाला मांडीवर दे म्हणून लहान बहीणीनें हट्ट घेतला आणि मग मांडीवर घेऊन अनेक बाल्यसहज प्रश्न ती आईला विचारू लागली—]

हंसतो आई बोलेल कधी तरि बाइ ?
इवले इवले याचे हात
याचे आई काय हतात ?
घालि सापडे तें तोंडात
ओढुनि घेई, बोलेल० ?

रांगायाला काधि लागेल ?
उठुन उभा हा कधि राहील ?
माझ्या संगे काधिं खेळेल
झिम् झिम् बाई — बोलेल० ?

सारखाच हा कां ग निजतो ?
झोपेमाधि हा खुद्कन हंसतो
जागा होता टकमक बघतो
लुच्चा बाई — बोलेल०

'मधू' म्हणिन मी आई याला
सदरा रेशमि शिवीन त्याला
खिसा खाउला लाविन त्याला
बघतो बाई — बोलेल०

वाढदिवस काधि याचा आई
खीर कसा हा खाइल बाई ?
दात अजुन या एकहि नाहीं
गंमत बाई, जेवेल कसा गं आई ?

बघ आई हा रडू लागला
पाळण्यांत तूं ठेवी याला
गाणें म्हणुनी निजविन त्याला
परि हा आई अजुनीही जागा राही.

गोड तयाचा पापा घेउन
विचारलेले गेली विसरुन
गाण्यामांजी तान्हा गुंगुन
झोपी जाई, कौतुकें पाहते आई !

# उपासना

( जाति–बांसरी )

ज्ञान ज्योत तेवुदे हृदीं अशीच देवते !
तूझिया उपासने परी न भाग्य कोणते.
नित्य धावत्या मनां
घाल प्रेम बंधना
ज्ञान प्रेम या परी पवित्र अन्य कोणते ? १

ध्येय एक तूं मला
उषेसमान मंगला
विराजते प्रभा तुझी तमास जी विदारते २

गीतरुप कोमला
गेय एक तूं मला
चित्त शांत होउनी त्वदीय गानि रंगते ३

शब्दरुप ब्रह्म तूं
शांति प्रेमगीत तूं
भक्तिरुप शक्ति तूंच, जाणतात जाणते. ४

अज्ञ लेकरावरी
देवते कृपा करी
तूझियाविना न कोणि भाव अन्य जाणते ! ५

# जीवित क्षण-भंगूर

भू. वै.

जों कळी जराशी लागे मंद हसाया
अन् जरा लागला मंद सुगध सुटाया
तो अगदि अचानक गळून पडली खाली
निमिषांत उन्हानें अगदी करपुनि गेली
परि येथें अजुनी येतो मंद सुगंध
मातीस लागला काय कळीचा गंध
की गुणवतांची कृति अशीच जगांत
बदलून टाकती खलवृत्ती निमिषांत
तै विकसित सुमनें शोक भरानें रडली
काळाची निष्ठुर करणी हसुनी वदली
अस्पष्ट उमटले शब्द तिथें भेसूर
' मानवा खरोखर जीवित क्षण-भंगूर'
हे जीवित चंचल तरल जलधिच्या वीची
अन् अशीच वाहे लाट जगीं काळाची
नव एकी मागुन एक येउनी जाती
चालल्या भंगुनी अखंड तीरा वरती
गे कलिके तव हे जीवित कितीतरि छान
ज्वानी ज्वानीत बरे हे जाणे जग सोडून
मरण्यांत काय सुख होउनि अगदी जीर्ण
कीं पिवळे होउनि गळते तरुचे पर्ण.

# श्रीविवेकानंद वंदन

[ पांडव दिंडकी ]

ज्या सनातन धर्म प्यारा आपल्या प्राणाहुन
हिंद-भू ज्याचे धन
जो विरागीं पूर्ण तेजस्वी तयाला वंदन
चित्त होवो पावन
घेउनी हा धर्मझेंडा जो त्रिखंडी हिंडला
सत्यवादा झुंजला
वन्द्य तो नर-केसरी ज्या वंदती शत्रूजन
भेद भावा सोडुन
धुंद झाले स्वार्थमार्गी मायभूला सोडुन
झोपले जें झिंगुन
त्या जनां जागे कराया धावला जो गर्जुन
दंड हातीं घेऊन
कांति तेजःपुज ज्याची लाजवीते भास्करा
कर्म-मार्गी जो खरा
शुद्ध ओजस्वी जयाची वाणि सारे ऐकुन
थक्क झाले मोहुन
जाहला जो मृत्युलोकी राम-कृष्णा सारखा
दक्ष कार्यी सारखा
राष्ट्रकार्यी धर्मकार्यी आयु गेला वेंचुन
हिंद-बाणा दावुन
श्रीविवेकानंद चरणी लीन माझे वंदन
चित्त होवो पावन.

# विरंगुळा

[ बांसरी ]

मूक भावगीत हें असेच ऐकुदे मला
जीवनांत एवढाच माझिया विरंगुळा
तूं वसंत कोकिळा
मधुप मी वनांतला
गीतगुंजनी रमून मी भ्रमेन एकला.
लाजरीच तूं लता
मंगला प्रसन्नता
दूर राहसी म्हणून खेद ना मुळीं मला.
दूर शुक्र-तारका
सुखद लोचना न कां ?
निकट राहता अवज्ञ स्नेह तोच जाहला.
प्रेम पाशवी म्हणे
मूढ तोच मानणे
लेखुदे खुळा खुशाल अज्ञ तो कुणी मला.
राहसी कुठे जरी
दूर चांद्रिके परी
सागरा समान या गभीर राहुदे मला.
रम्य दर्शनें तुझ्या
उठति भाव वीचि ज्या
थोपवू शके न मी तयास दोष एकला.
तूं तमिस्त्र जीवनीं
चांदरात मोहिनी
जीवनांत बिंबुदे अशीच माझिया कला.
अंतरी निनादते
प्रेमगीत गोड तें
सूर-स्वप्नि रंगुनीच तृप्त राहुदे मला !

# अभङ्ग

गातंसे मी सान रानचें पाखरूं
नको दूर करु यासी देवा

तूंच ह्या दिलेल्या सान पंखावरी
मारी मी भरारी आनंदात

नाही गोड गळा अर्थ नसे यात
प्रेम हृदयांत आहे परी

तुझिया गायनीं विश्व होइ रत
माझे सूर त्यांत मिळो जावे

नित्य तुझे नाम गोड मनी गावे
आनंदात जावे रमूनिया

लागुदे मनाला हीच एक आस
नको लेकरास दूर करू !

# गोड वेड

[ सुनीत शा. वि. ]

येता पायि तुझ्या मला जन जगीं वेडा म्हणू लागले
‘ नादीं लागुनिया हिच्या न जगतीं झाले कुणाचे भले ’
लाभे काय मला पदी जगि हिच्या येना जरी सांगता
वेडानेंच अशा जगांत मिळते वाटे मला शांतता
दृष्यें नित्य विरोधि पाहुन जदा चिद्वृत्ति हेलावती
येता पायि तुझ्या परी निवळुनी त्या संथता पावती
होतां चंचल चित्त पायि जडुनी संपूर्ण एकाग्रता
येते मूर्ति दिसून रम्य कृति वा लाभे कला पूर्णता
ज्योती तेजमया अनंत फिरती व्योमांत वेड्यापरी
काहींना नित लाभते अढळता वेड्या ध्रुवाच्यापरी
वेड्यांचे वच जें जगास दिसती सूज्ञास होती धडे
धिःकारुन तयास अज्ञ जनता टोचून मारी खडे.
लागो वेड तुझेच गोड मजला हे मंगले देवते
घेते जाळुन ज्योत आत्मतनुला तेव्हाच ती तेवते.

[library stamp]

# गत–विभव

[ प्रणय प्रभा ]

दिपवुन टाकी अरिनयना
–जिंकून येउ ते विभव पुन्हा
इतिहासाची पानें बघुनी
चित्त चरकते घोर चुकानी
' परि पडणारा चढे फिरूनी '
देऊ पटवुनि हेच जना० १
हेमवती जी भूमी होती
अन्नाला मोताद आज ती
हीन याहुनी स्थिती कोणती ?
हो घोर अल्पसंतोष गुन्हा० २
भूतकाळची भुतें येउनी
आग लावती चित्ता फिरूनी
सळसळती मग नसां चेतुनी
शांति लाभणें कशी मनां० ? ३
नवशक्तीचा खड्ग घेउनी
काळाशीही येउ झुंजुनी
पाठिराखि ही असे भवानी
जगि अज्ञातच ठेवू ना० ४
मनास लावू स्वदेश ध्यास
उद्योगाची धरुनी कास
निर्धनतेला लावू फास
जिंकुन येऊ यशोधनां० ५

# कधी ?

[ सुनीत भिल्लीण ]

येशील उषा-गीत कधीं गांत मुखानें ?
उल्हास जिवा देशिल त्या मंद स्मितानें
ऐकून तुझी पाउल चाहूल कधीं मी
सानंद मनीं होऊन त्या आतुरतेनें ?
ऐकीन कधीं कानि तुझी प्रेमळवाणी
भेटेन तुला केवि पुन्हा प्रेमभरानें ?
तूं गुंग कुठें मंगल ताऱ्यावर व्योमी
कीं गानसमाधीत कुठें धुंद सुखानें ?
येऊन मला कोयळ-आलाप विमानीं
ने बैसवुनी तेथ मला देवि झणी ने
कीं चंद्र-कलेचीच सखी होउन तेथें
तूं दंग सुधासिंचनि सानंद सुमानें
आशाच उषा केवि हृदी दावुनि दीप्ती
ह्या धुंद दिशा होति कधी सोज्वळ होणे ?

# फुलवेल

मनीं माझ्या कोवळी ही फुलवेल अंकुरली
भावजला शिपूनिया प्रेमे तिज पालवली
सान कळ्या कांहीं येता वृत्ति माझी अस्थीरली
उमलण्या मुग्ध कळ्या वाट किती मी पाहिली !
हृदयीच्या वेणूवर भावगीतें मी गाइली
कळी डोले वेलीवर क्षण भासली हांसली
अधीर मी मनी झालों कळी कोंवळी तोडली.
डोळे मोठाले करून फुलवेल रागावली
उषा-अरुणानी तिची समजुत किती केली
वसंतात परी सारें झणीं विसरुन गेली
मंद हासली डोलली फुलवेल  बहरली
फुले हासरी वेचुनी वनमाला मी गुंफीली
वाट पाहूनिया तुझी  माळ वाटे  सुकलेली
वाहताच प्रभु पायीं फुले फिरुन हासली.

# वन-बाला

भू. वै.

तूं अशी एकली वनांत फिरसी कां गे ?
कां अशी पाहसी मधेच दचकुनि मागें
साधीच बांधशी सुंदरशी किंति वेणी
ती सुबक साधुनी दिसते अतिशय खुलुनी
ना अंगावरती तुझिया माणिक मोती
ना कंठीं तुझिया मौक्तिक माळा रुळती
कीं ' बाल कवीची ' साधी तूं फुलराणी
अभिजात सुंदरा न लगे वरकड लेणी
तव कुसुम कोमला गौर केतकी काया
आणते चारुता अधिकच रम्य वना या
तव तनुल तनूला बघुन रानच्या वेली
लाजून लता तर लववति माना खाली
हे नील कमल तव नयन तेज देखून
जळि लावून पाही बिंब मनीं विरमून
क्षण नभी लावसी दृष्टी वरचेवर तूं
क्षण गोंधळसी तूं काय तुझा तरि हेतू ?
की मनांत येते वनबाला तूं काय ?
ना कुंकुम कैसे तुझिया भाळीं हाय ?

# अंगाई !

[ ओवी ]

बाळा नीज भुईवर आणू कोठून पाळणा?
        निजतो ग माझा कान्हा !
सोने नाहुन नीजले गालि शोभते कांजळ
        खेळूनिया दमे बाळ
फुगा टाकूनिया दिला दूर तसा खुळ-खुळा
        पुरे झाला आता चाळा.
बाळ निजे चिमण्यानो करु नका चिंवचिंव
        किति तुम्हाला सांगाव !
माऊ नको म्यॉंव करू दूध उरे सोनूल्याचें
        तुला मागून द्यायाचें
बाळ निजे कोणी आता करु नका गलबला
        आळीमिळी जरा घाला.
हातामधें मनगट्या मुठि झाकून घेतल्या
        मिटलेल्या जणूं काळ्या
गरिबाचा बाळा तुला चौघडीचा शेला केला
        पांघराया तुला दिला
गरिबाची खोप माझी नाहि तिला पुरे दार
        वारा येई किती गार
आणि मांडीवरुनी बाळ आई ठेवी खाली जसें
        झोपेमधें बाळ हासे.

# सांजवात

( चाल–' येसि कशाला दारीं ?' यशवन्त )

तेज जरी मंद देत
लावियली सांजवात
दिनभर रवि राबुनिया
तापवितो निज काया
मावळून शांत होत लावियली०
गाइगुरें घरि येती
पथि गोरज उडत अती
वेणुनाद कानि येत लावियली०
गोप शिशू दमुनि येति
कोटरिं निज विहग जाति
मंजुळ तव गीत गात लावियली०
ज्ञान तेज देइ हिला
मग मुळि ना भीति मला
मालविण्या कोण धजत ? लावियली०
ओवाळुनि तुज वरुनी
नाम गोड घेत मनीं
तव पायीं होइ विनत. लावियली०
जरि टीका वायु-झोत
मालविण्या ज्योत येत
तरि राहिल ही तेवत, पाजळली सांजवात

५८२९

REFBK-0005626
REFBK-0005626